जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२५६९/२०१९

**प्रेसनोट** दिनांक - २३/१२/२०१९

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन तार्त्पुता स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

**देहुरोड तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत**

१.जुना मुंबई पुणे हायवे सोमाटणेकडुन निगडी (पुणे) कडे जाणा-या सर्व वाहनांना सेंट्रल चौकातुन पुढे जाण्यास मनाई करण्यात यावी.

**पर्यायी मार्ग** - सेंट्रल चौकातुन उजवीकडे वळुन मुंबई बैंगलोर हायवे मार्गे इच्छित स्थळी जातील.

२.पिंपरी कडुन देहुरोड मार्गे मुंबईकडे जाणारी सर्व वाहतुक भक्तीशक्ती चौकातुन पुढे जाण्यास मनाई करण्यात यावी.

**पर्यायी मार्ग** - पिंपरी कडुन देहुरोड मार्गे मुंबईकडे जाणारी सर्व वाहने भक्तीशक्ती चौकाकडुन डावीकडे वळुन रावेत मार्गे इच्छित स्थळी जातील.

**वरील प्रमाणे देहुरोड तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत येणा-या व जाणा-या सर्व प्रकारच्या वाहनांकरीता वरील मार्गावर दि.२५/१२/२०१९ रोजी सकाळी०७.०० ते २२.०० वाजे पर्यत वाहतुक वळविणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.**

**सुधीर हिरेमठ** भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

**प्रति,**
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी देहुरोड तळेगाव वाहतुक विभाग
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कंन्टोन्मेंट बोर्ड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner